## निशाणी ०५ खालील आदेश

**( जायदाबी उर्फ जायदा इकबाल पटेल वि. मुनव्वर पटेल )**

**CNR.No.MHSI04-000764-2022**

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार हिने फौजदारी प्रक्रिया संहिता १२५ अन्वये दाखल केलेला असून, सदर अर्जाचा निकाल होण्यास बराच कालावधी लागणारा असून दरम्यानच्या काळात अर्जदार हिचे उपजिविकेचे आर्थिक साधन काही नसल्यामुळे उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच अर्जदार हिच्यावर कर्करोगाचे शास्त्रक्रिया झालेले असून तिच्यावर औषधोपचार सुरू असल्याने तसेच अर्जदार हिला उच्चरक्तदाबाचा त्रास असून अर्जदार हिला औषधोपचारासाठी पैशांची गरज असलेमुळे अर्जदार हिला अंतरिम पोटगी रक्कम रूपये १५,०००/– इतकी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

२. अर्जदार हिच्या मते, ती गाव मौजे मु.पो.आंब्रड, मुस्लीमवाडी ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील कायमची रहिवासी आहे. सामनेवाला क्र. १ व २ हे सध्या गाव मौजे साकेडी, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग येथे राहत आहेत. सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिचा मुलगा असून सामनेवाली क्र. २ ही अर्जदार हिची सून आहे. सामनेवाला क्र. १ याचा सामनेवाली क्र. २ हिच्या बरोबर प्रेम संबंध असल्याने त्यांचा विवाह मुस्लीम धर्माच्या चालीरित्याप्रमाणे घरची मंडळी व आप्तेष्टांच्या उपस्थितीत दि. २२/०४/२०१७ रोजी सामनेवाली क्र. २ हिच्या घरी म्हणजेच गाव मौजे साकेडी, ता.कणकवली येथे विवाह संपन्न झालेला आहे. लग्न झाल्यानंतर सामनेवाली क्र. २ ही सामनेवाला क्र. १ यांच्यासोबत गाव मौजे आंब्रड, मुस्लीमवाडी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथे सामनेवाला क्र.१ यांच्या वृध्द आईसोबत राहत होती. सामनेवाला क्र. १ हा नोकरी करून आपल्या वृध्द आईचा पालनपोषण औषधोपचाराचा खर्च करून आपला संसार चालवत होता. अर्जदार हिच्याबरोबर सामनेवाला क्र. १ व २ यांनी काही दिवस संसार व्यवस्थित चालवत होता. परंतु सामनेवाली क्र. २ ही घरात काहीही कामे न करणे, उशीरा उठणे, वारंवार फोनवर बोलणे, अर्जदार हिला वेळेवर जेवण न देणे असे प्रकार करत होती. त्यावर अर्जदार हिने

सामनेवाल क्र.२ हिला विचारणा केली असता, सामनेवाला क्र. २ ही अर्जदार हिच्यासोबत भांडण करायची व असे सांगायचे की, 'मी काहीही काम करणार नाही, सगळे कामे तुमीच करा, तसेच मला आंब्रड गावात राहणे आवडत नाही' असे उध्दट उत्तरे अर्जदार हिला दयायची. त्यामुळे घरातील सर्व कामे अर्जदार ही स्वत:च करायची. काही दिवसांनी सामनेवाला क्र. १ याला सामनेवाला क्र. २ हिने आपल्या घरी म्हणजेच गाव मौजे साकेडी, ता.कणकवली येथे जावून राहण्याचा हट्ट धरला. परंतु, अर्जदार हिचा मुलगा म्हणजे सामनेवाला क्र. १ याने साकेडी गावात जावून राहण्यास नकार दिला.

अर्जदार पुढे असे कथन करते की, सामनेवाला क्र.१ याने सामनेवाला क्र. २ हिला साकेडी गावात जावून राहण्यास नकार दिल्यानंतर सामनेवाली क्र. २ ही स्वत:हून आपल्या माहेरी म्हणजेच गाव मौजे साकेडी, ता.कणकवली येथे राहण्यास गेली. त्यानंतर सामनेवाला क्र.१ हा काही दिवस अर्जदार ही वृध्द असल्यामुळे अर्जदार हिची सेवा करण्यासाठी सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिच्याबरोबर राहत होता. त्यानंतर सामनेवाला क्र. २ हिने सामनेवाला क्र. १ याला फोन करून असे सांगितले की, 'माझ्या सोबत संसार करण्यास माझ्या माहेरी साकेडी गावात या, नाही आलात तर मी पुन्हा तुमच्यासोबत संसार करणार नाही' असे सामनेवाली क्र. २ हिने समानेवाला क्र. १ याला धमकी दिली. त्यानंतर अर्जदार हिने सामनेवाला क्र. २ हिची समजूत काढण्याचा खुप प्रयत्न केला.

अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदार ही वृध्द असल्यामुळे ती कुठल्याही प्रकारचा कामधंदा करून शकत नाही व वरचेवर आजारी असल्याने अर्जदार ही घरातून बाहेर कामधंदयासाठी जावू शकत नाही याची कल्पना सामनेवाला क्र. १ व २ यांना असताना सुध्दा सामनेवाला क्र. १ व २ यांनी सांगनमत करून सामनेवाला क्र. २ हिच्या हट्टापाई सामनेवाला क्र. १ हा सामनेवाला क्र. २ हिच्या माहेरी राहण्यासाठी गेला व अर्जदार हिच्याबरोबर व राहण्याचे एकमेव विचार केला. अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ व २ यांची समजूत काढण्यासाठी गावामधील चार प्रतिष्ठीत माणसांसोबत सामनेवाला क्र. २ हिच्या घरी म्हणजेच गाव मौजे साकेडी, ता.कणकवली येथे जावून सामनेवाला क्र. १ व २ यांची

समजूत काढून पुन्हा सासरी म्हणजेच गाव मौजे आंब्रड, ता.कुडाळ येथे नांदण्यास येण्यासाठी विनंती केली, परंतु, त्यावेळी सामनेवाला क्र. १ व २ यांनी स्पष्ट शब्दात नकार देवून आम्हाला तुमच्यासोबत राहण्याची इच्छा नाही. सामनेवाला क्र. २ हिने अर्जदार हिला असे सांगितले की,'मी गाव मौजे साकेडी कणकवली येथेच राहणार तुमच्या मुलालाही तुमच्याकडे पाठवणार नाही असे अर्जदार हिला सांगितले.

अर्जदार पुढे असे कथन करते की, सामनेवाला क्र. १ व २ यांनी सामनेवाली क्र.२ यांच्या आई वडीलांसोबतच राहणार असे उध्दट उत्तरे अर्जदार हिला दिले. त्यानंतर अर्जदार हिला सामनेवाला क्र. १ व २ हे तिच्यासोबत गाव मौजे आंब्रड, मुस्लीमवाडी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथे राहण्यासाठी येणार नाही याची पूर्ण खात्री झाली. अर्जदार ही वयोवृध्द व आजारी असल्याने व कोणीही कामधंदा करू शकत नसल्याने अर्जदार ही आपले दैनंदिन गरजा पूर्ण करू शकत नाही त्यामुळे तिच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच सामनेवाला क्र. २ हिच्या सांगण्यावरून सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिला दैनंदिन गरजेसाठी व औषधोपचारासाठी पैसे देत नसल्याने अर्जदार हिचे हाल होत आहे. त्यामुळे अर्जदार हिला मानसिक धक्का बसलेला असून अर्जदार हिची तब्येत खालावलेली आहे.

अर्जदार पुढे असे कथन करते की, सामनेवाला क्र.१ हा गाव मौजे साकेडी, ता– कणकवली येथे राहत असल्याने अर्जदार हिची साधी विचारपूस सुध्द करत नाही. अर्जदार ही नेहमी आजारी असते तसेच अर्जदार हिच्यावर कर्करोगाचे शास्त्रक्रिया झालेले आहेत तसेच अर्जदार हिला उच्चरक्तदाबाचा त्रास आहे याची सुध्दा कल्पना सामनेवाला क्र. १ व २ यांना आहे तरी सुध्दा सामनेवाला क्र. १ व २ हे अर्जदार हिच्या आजाराबाबत कुठलीही चौकशी करत नाहीत. अर्जदार ही जुलै २०२१ या महिन्याच्या दरम्याने खुप आजारी असताना सुध्दा सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदार हिची साधी विचारपूस सुध्दा केली नाही किंवा अर्जदार हिला बघण्यासाठी आंब्रड येथे घरी सुध्दा आलेल्या नाहीत. तसेच अर्जदार हिला औषधोपचारासाठी पैसे सुध्दा दिलेले नाहीत. अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ याला फोनद्वारे संपर्क साधुन घरी येण्यास विनंती केली व औषधपाण्यासाठी पैशांची

मागणी केली असता समानेवाला क्र.१ याला फोनद्वारे संपर्क साधुन घरी येण्यास विनंती केली व औषधपाण्यासाठी पैशांची मागणी केली असता सामनेवाला क्र. १ व २ यांनी पैसे देण्यास नकार दिला व आम्ही घरी येणार नाही मी माझ्या बायको सोबत बायकोच्या माहेरीच राहणार असे सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिला सांगितले. अर्जदार ही नेहमीच औषधोपचारासाठी व दैनंदिन खर्चासाठी अर्जदार ही मुली व नातेवाईकांकडून पैशाची मदत घेत आहेत. परंतु, त्यांना देखील तिला मदत करणे अशक्य होत आहे. अर्जदार ही सध्या एकटीच आंब्रड गावात राहत आहे. अर्जदार ही आजारी असून सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिला औषधपाण्यासाठी व रोजच्या खर्चासाठी पैसे ही देत नाही त्यामुळे अर्जदार हिच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

अर्जदार पुढे असे कथन करतात की, सामनेवाला क्र. १ व २ हे गाव मौजे साकेडी ता– कणकवली येथे राहत असल्यामुळे तसेच आंब्रड गावात येणार नाही याची पूर्ण खात्री झाल्यामुळे अर्जदार हिने नाईलाजास्तव वकीलांमार्फत दि.११/१०/२०२१ रोजी सामनेवाला क्र. १ व २ यांना नोटीस पाठवून अर्जदार हिला औषधोपचारसाठी व मुलभूत गरजांसाठी लागणारी रक्कम रूपये दरमहा १०,०००/– सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदार हिला पाठवावी अशी नोटीस पाठविली. सदरची नोटीस सामनेवाला क्र. १ व २ यांना दिनांक १८/१०/२०२१ रोजी मिळाली. सामनेवाला क्र. १ व २ यांनी वकिलांनी पाठविलेली नोटीस मिळाल्यानंतर सामनेवाला नं. १ हा स्वत:हून अर्जदार हिच्याकडे अधुन मधून येवून राहत असे. अर्जदार हिने सामनेवाला नं.१ याच्याकडे औषधोपचारासाठी तसेच जीवन आवश्यक मुलभूत गरजांसाठी पैशांची मागणी केली असता सामनेवाला क्र. १ याने माझ्याकडे सध्या पैसे देणे शक्य नाही असे खोटी कारणे सांगून पैसे देण्यास टाळाटाळ करत असे. त्यामुळे अर्जदार हिला जीवन जगणे कठीण झालेले आहे. तसेच अर्जदार हिची उपासमारीची वेळ आलेली आहे.

अर्जदार पुढे असे कथन करते की, सामनेवाला क्र. २ ही सतत सामनेवाला क्र. १ याला फोन करून सामनेवाली क्र. २ बरोबर माहेरीच रहा अर्जदार हिच्यासोबत राहू नका असे वारंवार

सांगायची. त्यामुळे सामनेवाला क्र. १ हा सामनेवाली क्र. २ सोबत साकेडी गावातच राहत आहे. तसेच सामनेवाली नं.२ ही अर्जदार हिला फोन करून मारण्याची धमकी देखील दयायची. दि. २५/११/२०२२ रोजी अर्जदार ही तापाने खूप आजारी होती. त्यावेळी अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ याला फोन करून घरी येण्यास सांगितले की, मी तुझ्याकडे येणार नाही, तु तुझा काय ते बघ, तुझ्या औषधोपचारांसाठी माझ्याकडे पैसे नाही, तु मेलीस तरी चालेल, मी माझ्या बायकोसोबत साकेडी गावातच राहणार' असे अर्जदार हिला सांगितले. त्यानंतर अर्जदार हिने आपल्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तींना बोलावून औषधोपचार केले. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ हा मुलगा असल्याने तो सुधारेल व माझ्यासोबत आंब्रड गावात येवून राहील अशा भ्रमात होती. परंतु सामनेवाला क्र. १ हा सामनेवाली क्र. २ हिच्या सांगण्यावरून अर्जदार हिच्यासोबत आंब्रड गावात येवून राहत नसल्याने तसेच अर्जदार हिला औषधोपचारासाठी व दैनंदिन खर्चासाठी काहीही पैसे देत नसल्यामुळे अर्जदार हिची उपासमारीची वेळ आलेली आहे व अर्जदार हिला मानसिक धक्का बसलेला आहे. सामनेवाला क्र. १ व २ यांनी सन २०१९ पासून अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास देवून तसेच अर्जदार हिची विचारपुस न करणे, अर्जदार हिला दैनंदिन खर्चाची, औषधपाण्याची, कपडयालत्त्याची अशी कोणतीही तरतुद केलेली नाही. तसेच अर्जदार हिची पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र. १ याचीच आहे. त्यामुळे अर्जदार हिला जीवन जगणे कठीण झालेली आहे.

अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदार हिची परिस्थिती अत्यंत गरीबीची आहे. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याच्यावर पूर्णपणे विसंबून आहे. सामनेवाला क्र. १ हा कणकवली येथील एच.डी.एफ.सी बँकेत वॉचमन म्हणून नोकरीला असून तो दरमहा रक्कम रूपये २५, ०००/– एवढी रक्कम कमावत आहे. सामनेवाला क्र. १ हा सामनेवाली क्र.२ हिच्यासोबत ऐषोआरामामध्ये जीवन जगत आहे. सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिला औषधोपचारासाठी व दैनंदिन खर्चासाठी काहीही पैसे देत नसल्यामुळे अर्जदार हिची उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे अर्जदार हिला मानसिक धक्का

बसलेला आहे. सबब, अर्जदार हिला सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडलेले आहे.

**३.** प्रस्तुत अर्जास सामनेवाला क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.१० लगत म्हणणे सादर केलेले असून अर्जदाराचे अर्जातील कथनांचा स्पष्टपणे इन्कार केलेले आहे. सामनेवाला यांच्या मते, अर्जदार हिच्या अर्जातील व अंतरिम पोटगी अर्जातील मजकुर धादांत खोटा व खोडसाळ असून मे.कोर्टाची दिशाभूल करणारा आहे. सदरचा मजकुर सामनेवाला क्र. १ व २ यांना मान्य व कबूल नाही. सामनेवाली क्र. १ हिने अर्जदार हिला कधीही उध्दट उत्तरे दिलेली नाहीत अथवा अर्जदार हिला कोणतीही कामे करण्यास सांगितलेली नाही. सामनेवाला क्र. १ याने सामनेवाला क्र. २ हिला साकेडी गावात जावून राहण्यास नकार दिल्यानंतर सामनेवाला क्र. २ ही स्वत:हून आपल्या माहेरी म्हणजेच गाव मौजे साकेडी, ता–कणकवली येथे राहण्यास गेली.

सामनेवाला पुढे असे कथन करतो की, अर्जदार ही मुळात हट्टी व हेकेखोर स्वभावाची आहे. अर्जदार हिचे म्हणणे सामनेवाला यांनी खरे मानले पाहिजे व आपण सांगू तसे वागले पाहिजे असे अर्जदार हिला कायम वाटत असे. सामनेवाला हा अर्जदार हिचा सांभाळ व पालनपोषण करण्यास आजही तयार आहे. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिची जबाबदारी केव्हाही टाळलेली नाही. परंतु अर्जदार हिच्या हट्टी, हेकेखोर स्वभावामुळे तीच सामनेवाला यांच्यासोबत राहण्यास तयार नाही ती जाणीवपूर्वक सामनेवाला क्र. १ यांचेसोबत न राहता वेगळी राहत आहे. अर्जदार हिने आपल्या अर्जात कथन केल्याप्रमाणे सामनेवाला क्र. १ हा एच.डी.एफ.सी. बँकेत वॉचमन होता. परंतु त्याला फेब्रुवारी २०२३ मध्ये बँकेने नोकरीतून कमी केलेले आहे. सामनेवाला क्र. १ हा सद्यस्थितीत कणकवली येथे ड्रायव्हर म्हणून काम करतो. त्याला प्रतिमहिना रक्कम रूपये ९,०००/– इतका पगार आहे.

सामनेवाला पुढे असे कथन करतो की, सामनेवाला क्र. १ याला एच.डी.एफ.सी. बँकेतून फेब्रुवारी २०२३ मध्ये कमी केल्यानंतर तो दुसऱ्या कामाच्या शोधात होता. त्याला कणकवली येथील एका प्रतिष्ठीत व्यक्तीच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून नोकरी मिळाली. आंब्रड ते कणकवली हे

अंतर सुमारे १५ किलोमीटर असल्याने सामनेवाला क्र. १ याने अर्जदार व सामनेवाला क्र. २ यांना आपण कणकवली येथे भाडयाने राहू म्हणजे सामनेवाला क्र.१ यांस कामावर वेळीच उपस्थित राहणे शक्य होईल असे सांगितले. त्यावेळी अर्जदार हिने आपण कणकवली येथे राहणार नाही असे सामनेवाला क्र. १ व २ यांनी सांगितले. नाईलाजास्तव सामनेवाला क्र. १ हा सामनेवाली क्र.२ सोबत कणकवली येथे भाडयाने राहू लागला. अर्जदार हिची हेळसांड व तिचेकडे दुर्लक्ष होवू नये म्हणून सामनेवाला क्र. १ व २ हे सुट्टीच्या दिवशी व वेळ मिळेल तसे अर्जदार सोबत राहू लागले व तिची सेवासुश्रुषा करू लागले.

सामनेवाला पुढे असे कथन करतात की, अर्जदार ही आपल्या दोन विवाहीत मुलींचे सांगणेवरून सामनेवाला क्र. १ व २ यांना जाणीवपूर्वक त्रास देत आहे. अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ व २ यांचेसोबत कणकवली येथे रहावे अशी सामनेवाला क्र.१ व २ यांची अपेक्षा आहे. परंतु, अर्जदार ही आपल्या हट्टी व हेकेखोर स्वभावामुळे सामनेवाला क्र.१ व २ सोबत राहण्यास तयार नाही. सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदार हिची कधीही हेळसांड, गैरसोय केलेली नाही अगर अर्जदार हिच्या अन्न, वस्त्र, कपडालत्ता, औषधपाणी इत्यादी मूलभूत गरजा पूर्ण करणेस नकार दिलेला नाही.

सामनेवाला पुढे असे कथन करतात की, अर्जदार हिचे पती तेच सामनेवाला क्र. १ यांचे वडील इकबाल जिक्रीया पटेल हे हयात आहेत. ते सध्या अलीबाग, जिल्हा–रायगड येथे राहत असून तेथे स्टेशनरीचा व्यवसाय करतात. तसेच अर्जदार हिला शकीला इरफान शेख व फरहान पटेल या दोन विवाहित मुली आहेत. अर्जदार हिने पती इकबाल पटेल व दोन्ही मुली अनुक्रमे शकीला शेख व फरहाना पटेल यांना याकामी पक्षकार केलेले नाही. त्यांना याकामी पक्षकार करणे अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे. अर्जदार हिच्या पालनपोषणाची तसेच तिच्या अन्न वस्त्र, औषधपाणी, कपडालत्ता इत्यादी मूलभूत गरजांची सामनेवाला क्र.१ प्रमाणेच त्यांची देखील जबाबदारी आहे.

सामनेवाला पुढे असे कथन करतात की, सामनेवाला क्र. १ हा कणकवली येथील एका प्रतिष्ठीत व्यक्तींच्या गाडीवर खाजगी ड्रायव्हर म्हणून काम करत आहे. त्याला प्रतिष्ठीत रक्कम रूपये ९,०००/– एवढाच पगार त्याचेवर त्याची पत्नी, तसेच दोन लहान मुले अनुक्रमे सुफिया व आरहान यांच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. त्याही परिस्थितीत सामनेवाला क्र. १ व २ हे अर्जदार हिची देखभाल, सेवासुश्रुषा करणेस तयार आहेत. त्यांनी अर्जदार हिची जबाबदारी केव्हाही टाळलेली नाही अगर टाळणारही नाहीत. अर्जदार हिने सामनेवाला यांच्यासोबत कणकवली येथे रहावे हीच सामनेवाला क्र. १ व २ यांची अपेक्षा आहे. अर्जदार हिने सामनेवाला यांना आर्थिक, मानसिक व शारिरीक त्रास देवून खर्चात टाकण्यासाठी प्रस्तुतचा खोडसाळ अर्ज दाखल केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

४. अर्जदार व सामनेवाला तर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्जाचे वाचन केले असता, अर्जदार हिने सदरचा अर्ज अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. याप्रमाणे या न्यायालयास अर्जदार हिला अंतरिम पोटगी देणेचा अधिकार आहे. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ यांची आई व सामनेवाला क्र. २ यांची सासू आहे. अर्जदार व सामनेवाले यांचेतील नातेसंबंधाबाबत कोणत्याही पक्षामध्ये मतभेद असल्याचे दिसून येत नाही.

६. प्रस्तुतकामी अंतरिम पोटगी ही अर्जदार हिला तिच्या दैनंदिन गरजा भागविणेकरिता तसेच तिला आत्मसन्मामाने जगता येणेकरिता मूळ अर्जाचे निकालापर्यंत सामनेवाला यांचेकडून आर्थिक मदत म्हणून मंजूर करणेत येत असते. प्रस्तुतकामी अर्जदार हिने तिचे आजारपणाबाबतचा वैद्यकीय कागदोपत्री पुरावा हजर केलेला आहे. अर्जदार हिने तिचेवर चालू असणाऱ्या वैद्यकीय उपचारा अनुषंगे खरेदी केलेल्या औषधांच्या पावत्या सादर केलेले आहेत. अर्जदार हिचे सदर वैद्यकीय पुरावा विचारात घेता, अर्जदार हिचेवर वैद्यकीय उपचार चालू असल्याचे प्रथम–दर्शनी दिसून येत आहे. तसेच

तिने सदर कामी हजर केलेल्या निशाणी क्र. १४/१ ते १४/१० लगतच्या औषध खरेदीच्या पावत्या विचारात घेता, पावत्या हया अर्जदार हिचे नावे करणेत आलेल्या दिसून येत आहे. यावरून अर्जदार ही आजारी असून तिला वेळोवळी औषधोपचाराची गरज असल्याचे दिसून येत आहे.

७. अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांविरुध्द केलेले आरोप व प्रत्यारोपांबाबत दोन्ही पक्षांनी पुरावा सादर केलेनंतरच निष्कर्षापर्यंत पोहोचता येणार आहे. तथापि, आजमितीस अर्जदार हिचे वय, तिची शारीरीक व मानसिक परिस्थिती तसेच तिला दैनंदिन जीवनाकरीता आवश्यक असलेले पाठबळ यांचा विचार करता, सामनेवाला क्र. १ याने मुलगा म्हणून अर्जदार हिचे पालनपोषणाची व औषधोपचाराची जबाबदारी पार पाडणे हे त्याचे नैतिक व कायदेशीर कर्तव्य आहे. अर्जदार हिला औषधोपचारासाठी व दैनंदिन खर्चासाठी काहीही पैसे देत नसल्यामुळे अर्जदार हिची उपासमारीची वेळ आलेली आहे व अर्जदार हिला मानसिक धक्का बसलेला आहे. अर्जदार हिला दैनंदिन खर्चाची, औषधपाण्याची कपडल्यालत्त्याची अशी कोणतेही तरतुद केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिला जीवन जगणे कठीण झालेले आहे असे कथन केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार हिस आवश्यक असणारे औषधोपचार पुरविणे तसेच तिचे पालनपोषण करणे सामनेवाला यांची जबाबदारी आहे. सामनेवाला यांनी सदर अर्जाचे कामी अर्जदार हिच्या पालनपोषणाची जबाबदारी घेणेकरीता कोणती हालचाल केली याबाबत कोठेही काहीही वक्तव्य केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये स्वतःच्या आईचा सांभाळ करणेस चालढकल करणे हा देखील कौटुंबिक हिंसाचाराचाच भाग आहे.

८. सामनेवाला क्र. १ हा कणकवली येथील एका प्रतिष्ठीत व्यक्तींच्या गाडीवर खाजगी ड्रायव्हर म्हणून काम करत आहे. त्याला प्रतिमहिना रक्कम रू.९,०००/- एवढाच पगार आहे. त्याचेवर पत्नी, तसेच दोन लहान मुले यांच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता त्यांचेवर त्याचे कुटुंबियांची जबाबदारी आहे हे निश्चीत आहे. सामनेवाला यांचे कथनानुसार ते अर्जदार हिची देखभाल, सेवासुश्रुषा करणेस तयार आहेत. त्यांनी

अर्जदार हिची जबाबदारी केव्हाही टाळलेली नाही अगर टाळणारही नाहीत. अर्जदार हिने सामनेवाला याच्यासोबत कणकवली येथे रहावे हिच सामनेवाला क्र. १ व २ यांची अपेक्षा आहे. तसेच सामनेवाला याचा दरमहा मिळणारे उत्पन्नाचा स्त्रोत निश्चित स्वरुपाचा असल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीमध्ये सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिची आर्थिक निकड विचारात घेवून तिचे पालनपोषणाकरिता दरमहा रक्कम रुपये ३,०००/- इतकी अंतरिम पोटगी देणेबाबत आदेश पारीत करणे मला न्यायोचित वाटत आहे.

-::- **आदेश** -::-

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** मूळ अर्जाच्या अंतिम निर्णयापावेतो अर्ज दाखल तारखेपासून सामनेवाला यांनी अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ३,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी रक्कम देणेची आहे.

**३.** खर्चाबाबत आदेश नाही.

**४.** सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना मोफत देणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GAJANAN AJAY KULKARNI
Date: 2024.07.20 17:51:12 +0530

( जी.ए.कुलकर्णी )

दिनांकः- १९/०७/२०२४. न्यायदंडाधिकारी वर्ग-१ कुडाळ .